# १०. जीवन सुंदर करू!

**शं. ल. नाईक** (१९५१) : प्रसिद्ध कवी. विविध मासिके, वृत्तपत्रे, नियतकालिके यांतून लेखन. त्यांची 'गंमत नगरी', 'प्राण्यांची शाळा', 'सोनी मोनी', 'डोंगर झाडीत', 'नदी किनारी' हे बालगीतसंग्रह; 'छान छान कोडी', 'कोडी ओळखा कोडी' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकवी पुरस्कार, काव्यगौरव पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जीवन सुंदर करण्यासाठी काय-काय करावे, हे सांगताना कवी मानवतेचे विचार आणि कर्तृत्व यांचं महत्त्व सांगतात. कर्तृत्वानेच माणूस खऱ्या अर्थाने मोठा होतो. त्यासाठी थोरांचा आदर्श समोर ठेवावा व ज्ञानाची आवड जोपासावी. उत्साहाने व शिस्तशीरपणे जगून जीवन सुंदर करण्याचे आवाहन कवी प्रस्तुत कवितेतून करतात. प्रस्तुत कविता 'किशोर', मार्च २०१३ या मासिकातून घेतली आहे.

● **ऐका. वाचा. म्हणा.**

मानवतेच्या विचारांचा वसा मनी हो धरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

झटकून टाकू आळस सारा
चैतन्य जागवेल पहाटवारा,
रोज पहाटे लवकर उठुनी, ज्ञानसागरी फिरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

ग्रंथ गुरुंची संगत ठेवू
ज्ञान झऱ्यांचे पाणी पिऊ,
होऊन गेले अनेक महात्मे, मार्ग त्यांचा अनुसरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

संकटे येता करू सामना
धैर्य देऊया अपुल्या मना,
जीवनाच्या ध्येयापासून, कधी न मागे सरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

नव्या युगाचे ज्ञान वाढवू
आपणच अपुले जीवन घडवू,
कर्तृत्वाने आपण सारे, भारतभूषण ठरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!



**शब्दार्थ : वसा** – व्रत. **झटकून टाकणे** – सोडून देणे. **चैतन्य** – उत्साह. **ज्ञानसागर** – ज्ञानाचा सागर. **संगत** – सोबत, मैत्री. **ज्ञानझरा** – ज्ञानरूपी झरा. **सामना करणे** – दोन हात करणे, लढणे. **भारतभूषण** – भारत देशाचे भूषण.



## स्वाध्याय

**प्र. १. पाठाधारे चौकटी पूर्ण करा.**

(अ) मनात ज्यांचा वसा धरायचा ते विचार

(आ) झटकून टाकायचा तो

(इ) चैतन्य जागवणारा

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

**ज्ञानप्राप्तीसाठी कवी काय काय करू इच्छितो ?**

**प्र. ३. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) ज्ञानसागरी फिरणे. | (अ) ज्ञानाची तहान भागवणे. |
| (२) ज्ञान झऱ्याचे पाणी पिणे. | (आ) नवनवीन संशोधनाने ज्ञानात भर घालणे. |
| (३) नव्या युगाचे ज्ञान वाढवणे. | (इ) भारताला अभिमान वाटेल असे कार्य करणे. |
| (४) भारतभूषण ठरणे. | (ई) ज्ञानप्राप्ती करून घेणे. |

**प्र. ४. योग्य पर्याय निवडा.**

(अ) संकट आल्यास........
- (१) घाबरून पळून जावे.
- (२) संकटांचा सामना करावा.
- (३) मोठ्यांचा सल्ला घ्यावा.
- (४) काहीच करू नये.

(आ) जीवन सुंदर करू म्हणजे........
- (१) सुंदर घर बांधू.
- (२) सुंदर कपडे घालू.
- (३) सुंदर सुंदर शब्द वापरू.
- (४) मानवतेच्या विचारांनी वागू.

**प्र. ५. खालील अर्थांच्या कवितेतील ओळी शोधा व लिहा.**

(अ) ज्ञान मिळवण्यासाठी रोज पहाटे उठून अभ्यास करू.

(आ) संकट आले तर घाबरून न जाता धैर्याने त्याला तोंड देऊ.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील 'धरू–करू' याप्रमाणे समान उच्चारांच्या शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

(१) सारा–

(२) फिरू–

(३) सामना–

(४) वाढवू–

(५) ठरू–

**(आ) खालील शब्दांना कवितेतील शब्द शोधा.**

(१) देखणे–

(२) सोबत–

(३) मित्रांनो–

(४) शिक्षक–



## विचार करा. सांगा.

- **जीवन सुंदर करण्यासाठी कवी काय काय करायला सांगतात, ते तुमच्या शब्दांत सांगा.**
- **'होऊन गेले अनेक महात्मे, मार्ग त्यांचा अनुसरू', या ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ सांगा.**

**उपक्रम :** आपल्या भारत देशाची शान वाढवण्यासाठी काम करणाऱ्या तुमच्या परिसरातील किंवा इतर ठिकाणच्या एका व्यक्तीची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

## भाषेची गंमत

आपण आजूबाजूला वावरत असताना, प्रवास करत असताना अनेक पाट्या वाचतो. त्यावर काही सूचना दिलेल्या दिसतात. भाषेचा वापर करत असताना बोलताना व लिहिताना आपण नैसर्गिकरीत्या थांबतो. बऱ्याच वेळा काही शब्द योग्य ठिकाणी न जोडल्यास किंवा न तोडल्यास वाक्याचा अर्थ बदलून जातो व त्यातून गंमत निर्माण होते.

उदा., (१) येथे वाहन लावू नये.

येथे वाहन लावून ये.

(२) बागेत कचरा टाकू नये.

बागेत कचरा टाकून ये.

या प्रकारची तुमच्या वाचनात आलेली वाक्ये लिहा व त्यातील गंमत समजून घ्या.



## वाचा.

- **उतारा वाचा व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

पुस्तकाकडे केवळ कागदांवर छापलेला मजकूर इतक्या मर्यादित अर्थाने पाहता येणार नाही. पुस्तकांनाही जीव असतो. त्यांना स्वत:चं व्यक्तिमत्त्व असतं. पुस्तकं आपल्याशी बोलण्यासाठी उत्सुक असतात. गरज असते ती आपण त्यांच्याशी बोलण्याची; संवाद साधण्याची! एकदा का पुस्तकांशी मैत्री जुळली, नातं निर्माण झालं, की मग पुस्तकांकडून फक्त घेत राहायचं. परमेश्वरानं आपल्याला एकच आयुष्य दिलं आहे; पण या एकाच आयुष्यात अनेक आयुष्ये जगण्याचा अनुभव आपल्याला केवळ पुस्तकंच देऊ शकतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कथा वाचायला लागलो, की त्यातील शब्दाशब्दांतून इतिहास जिवंत होतो. जंगलाबाबतचं वर्णन वाचताना घनदाट अरण्य, सृष्टीची मनोहारी रूपं पाहत पशुपक्षी, प्राण्यांशी संवाद साधतो, विनोदी कथेमुळे भन्नाट आणि गमतीदार लोकांच्या विश्वात आपण हरवून जातो, तर चरित्रे वाचताना प्रतिकूल परिस्थिती आणि थोरामोठ्यांचे कार्य आपल्याला अंतर्मुख बनवते. पुस्तक हे आयुष्याला संपन्न आणि श्रीमंत करणारं ज्ञानभांडार आहे. त्यातून मनोरंजन तर होतंच आणि जाणिवाही प्रगल्भ होतात. शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्वे अन्नातून, तर मन आणि बुद्धी यांच्या भरण पोषणासाठी आवश्यक सत्त्वे केवळ पुस्तकेच देतात म्हणूनच पुस्तक प्रकाशवाटा दाखवणारा मित्र असतो. त्याच्याशी नातं जोडायलाच हवं.

**(१) पुस्तकांची वैशिष्ट्ये कोणती?**

**(२) पुस्तकांना लेखकाने कोणती उपमा दिली आहे?**

**(३) 'थोरामोठ्यांची चरित्रे' आणि 'विनोदी कथा' वाचनाचा तुमच्या मनावर कोणता परिणाम होतो, असे लेखकाला वाटते.**

**(४) पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे तुमच्या शब्दांत लिहा.**

QCSV4Z